# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक १८/०४/२०२२ (सोमवार)

---

## एक लोखंडी देशी माउझर व एक जिवंत काडतुस एकुण किंमत ४६,०००/— रू चा माल जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक १२.०४.२०२२ रोजी पोलीस स्टेशन मौदा येथे अपराध क २३२/२०२२ कलम ३६३,३९४,३४ भादवि गुन्हयाचे समांतर तपास करीत असतांना, तपासादरम्यान कन्हान उपविभागात फिरत असतांना गोपनिय माहीती मिळाली कि, तारसा चौक येथे नकुल पात्रे हा त्याचे ताब्यात अवैधरीत्या देशी बनावटी माउझर घेवुन फिरत आहे. अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने, तारसा चौक येथे जावुन आरोपी नामे— **नकुल संगम पात्रे वय ३२ वर्ष रा सतरापुर कन्हान यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन एक लोखंडी देशी माउझर व एक जिवंत काडतुस एकुण किंमत ४६,०००/— रू चा माल जप्त करून पुढील तपासाकरीता पोलीस स्टेशन कन्हान चे ताब्यात देण्यात आले.**

सदरची कारवाई नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधिक्षक श्री विजयकुमार मगर, अपर पोलीस अधिक्षक मा. श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे यांचे नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक श्री अनिल राउत, पो.हवा नाना राउत, विनोद काळे, पो ना प्रणय बनाफर, शैलेश यादव, विरेंद्र नरड, चालक सफौ साहेबराव बहाळे याचे पथकाने पार पाडली.

**(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे**.)

## घरफोडी

**पोलीस स्टेशन बोरी** — अंतर्गत मौजा प्रभाग कं ०४ हनुमान मंदिर जवळ बुटीबोरी, यातील फिर्यादी हि कॅटरिंगचे कामावर स्वंयपाकाचे काम करित असुन दिनांक १६.०४.२०२२ चे ११.०० वा ते १७.०४.२०२२ चे ०५.३० वा दरम्यान घराला कुलुप लावुन कॅटरिंगचे कामाला गेली असता, अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून कपाटातील व हॅडबॅगमधील सोन्याचे दागिने व नगदी १०,०००/—रू असा एकुण ४०,०००/— रू चा माल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे — चंद्रकला ओमप्रकाश वर्मा वय ५२ वर्ष रा.प्रभाग कं ०४ हनुमान मंदिर जवळ बुटीबोरी ता.जि.नागपुर यांचे रिपोर्टवरून पो स्टे बोरी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४५४,४५७, ३८० भादवी अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयाचा पुढील तपास पोना गाते मो नं ९९२३०२७२१४ करीत आहेत.

## प्राणांकित अपघात

**पोलीस स्टेशन नरखेड :–** अंतर्गत जुनोना फुके शिवार १७ किमी पुर्व. दिनांक १७/०४/२०२२ चे १६.४५ वा. दरम्यान यातील १) मृतक रोशन नंदराम मुंगभाते वय २५ वर्ष रा मन्नातखेडी हा त्याचे मोटर सायकल क्र एम एच– ४० बी एच– ४१७३ वर मृतक क्र. १) रामचंद्र महादेव नेहारे वय ५२ वर्ष २) सौ. रंजना रामचंद्र. नेहारे वय ४५ वर्ष दोन्ही रा. वाजबोडी यांना बसवुन हिवरा येथुन वाजबोडी येथे जाण्याकरीता वडचिचोली ते सावरगाव रोडने जात असता जुनोना फुके शिवारामध्ये एक पांढऱ्या रंगाची बोलेरो गाडी क्र **एमएच– ४० बीजे–८५७४ चे चालकाने त्याचे ताब्यातील बोलेरो गाडी सावरगाव ते वडचिचोली रोडने भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन मृतक याचे मोटार सायकलला समोरून धडक मारल्याने मोटर सायकल वरील तिघेही ईसम गंभीर जखमी होवुन जागीच मरण पावले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गजानन महादेव नेहारे वय ४५ वर्ष रा.बाजबोडी ता. काटोल यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन नरखेड येथे आरोपी चालक नामे– विनोद हिरामन नेहारे वय २५ वर्ष रा चाकडोह तह कळमेश्वर यांचे विरूध्द कलम २७९,३०४ (अ),१८४ भादवी अन्वयें गुन्हा नोंद करून आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री जयपालसिंह गिरासे पो.स्टे. नरखेड मो. नं. ८३५५९५५५३८ करीत आहेत.

## मंदीरास आग लावुन नुकसान

**पोलीस स्टेशन रामटेक –** हनुमान मंदीर पाचगाव ०४ किमी पश्चिम रामटेक, यातील फिर्यादी यांनी हनुमान मंदीर पाचगाव येथील हनुमान जयंतीचा कार्यक्रम आटोपुन सर्व साहीत्य मंदीरात ठेवुन घरी निघुन गेले असता, दिनांक १७/०४/२०२२ चे ०२/०० वा. ते ०२/४५ वा दरम्यान यातील अज्ञात आरोपीने धर्माचा अपमान करण्याचा उददेशाने मंदीर/उपासनास्थान अपविन्न करून मंदीरास आग लावुन, मंदीरात ठेवलेले सर्व साहीत्याचे अंदाजे ६२,०००/– रू.चे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे – च्रंद्रभान चितांमन वाघमारे वय ५१ वर्ष रा हिवरा भेडे यांचे रिपोर्टवरून पो स्टे रामटेक येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम २९५, ४३६ भादवी अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी सोनवने मो.क्र. ८८०५७३०३६२ करीत आहेत.

## विहीरीत पडुन मृत्यु

**पोलीस स्टेशन रामटेक :–** अंतर्गत मौजा मुसेवाडी १० किमी उंत्तर, यातील मृतक नामे– सौ. इंदुबाई बंडु डोंगरे वय ५० वर्ष रा. मुसेवाडी हि शेतातील गाई वासरांना पाणी पाजण्याकरीता गेली व विहीरीतील पाणी काढत असतांना अचानक मृतक हिला गाईने धक्का दिल्याने मृतक ही विहीरीत पडुन विहीरीचे पाण्यात बुडुन मरण पावली.

सदर प्रकरणी फियादी नामे– बंडु रामाजी डोंगरे वय ५४ वर्ष रा. मुसेवाडी मो.न. ९३५६५१२१०७ याचे रिपोर्टवरून पो स्टे रामटेक येथे कलम १७४ जा फौ चा मर्ग दाखल करण्यात आला, सदर मर्गचा पुढील तपास पो हवा/ राजेन्द्र अडामे पोस्टे रामटेक मो.न. ९६३७४००८७३ करीत आहेत.

## विषारी औषध प्राशन करून आत्महत्या

**पोलीस स्टेशन कोढाळी :–** अंतर्गत मौजा कुंडी ८ किमी उ., यातील मृतक नामे– अतुल रामदास नेहारे वय २८ वर्ष रा. कुंडी ता काटोल याने दिनांक १३/०४/२२, चे १३/३० वा. दरम्यान, आपले राहते घरी कोणीही हजर नसताना, कोणत्यातरी अज्ञात कारणावरून विषारी औषध सेवन केल्याने त्यास उपचाराकरीता पी एच सी कोंढाळी येथे नेले असता, तेथुन रेफर केल्याने त्यास मेडिकल कॉलेज नागपूर येथे भरती केले असता डॉक्टरांनी तपासून दिनांक १५.०४.२०२२ चे ०९.०० वा. रोजी मृत घोषित केले. मृतकाचे कागदपत्र मेडिकल पोलीस बुथ नागपुर येथून पोस्टे ला प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फियादी याचे रिपोर्टवरून पो स्टे कोंढाळी येथे कलम १७४ जा फौ चा मर्ग दाखल करण्यात आला, सदर मर्गचा पुढील तपास पो ना/किशोर लोही  ९१४६४२२६३३ करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**